# अभिजातता -  एक परिचय!

(रवि परांजपे फौंडेशन आयोजित परिसंवाद)




"कला, सौन्दर्य, संवेदनशीलता, रचना, सर्जनशीलता, विज्ञान-आणि-तंत्रज्ञान, उद्यमशीलता, उद्योजकता, अर्थ-निर्मिती, वैभव, प्रगती, मैत्री-आणि-सद्-भावना, जीव-आणि-जगत कल्याण."

एका दृष्टीनी पहिले तर हे निव्वळ शब्द आहेत. परंतु ह्याकडे एका वेगळ्या दृष्टीने पहिले तर एक शृंखला, एक प्रवास दिसून येतो. कलेकडून जीव-आणि-जगत कल्याणाचा प्रवास. काय आहे ह्या सर्व शब्दातील आंतरिक संबंध? त्यातून एक शृंखला, एक प्रवास कसा निर्माण होतो? त्यामागे कोणती शक्ती आहे? तिचे नाव काय आहे? तिचे स्वरूप काय आहे? मानवी मनाला तिचे आकलन होऊ शकते का? साध्या, सोप्या शब्दात ह्या शक्तीची रचना मांडता येऊ शकते का? दैनंदिन आयुष्यात तिचे काय महत्व आहे? एक साधारण व्यक्ती आपल्या रोजच्या जीवनात ह्या शक्तीची अनुभूती आत्मकल्याणासाठी व जनकल्याणासाठी कशी घेऊ शकते? ही सर्व प्रश्ने महत्वाची आहेत का व ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात का?

ज्येष्ठ चित्रकार श्री.रवि परांजपे ह्यांच्या अनेक दशकांच्या चित्रकला साधनेने प्रेरित होऊन आम्ही सर्व, म्हणजेच रवी परांजपे फौंडेशन चे सदस्य, ह्या शेवटल्या प्रश्नाचे उत्तर 'हो' असे ठामपणे देऊ

शकतो. सर्व कला आणि उद्योगांच्या मुळाशी असलेल्या नवनिर्माणाची प्रेरणा देणाऱ्या शक्तीला आम्ही 'अभिजातता' असे संबोधतो आणि वरील शब्दशृंखलेच्या मुळाशी ती सतत कार्यरत असते असे आम्हाला प्रकर्षाने वाटते.

भारतात प्राचीन काळापासूनच 'घटा' कडे सृजनशील आदिशक्तीचे एक रूप म्हणून पहिले गेले आहे. पोकळीला घटाकर दिला की घट-अवकाश तयार होतो. तो मानव हिताचा असतो असे आमच्या सर्जनशील पूर्वजांना आढळून आले. मानवहिताचे अवकाश निर्माण करणे, त्यांतून लाभणाऱ्या मानवी सुखाला आंतरिक समाधानाची उच्चतम पातळी गाठण्याची जोड देणे हे भारतीय सृजनसंहितेचे महत्वाचे उद्दिष्ट ठरले. या उद्दिष्टामुळेच भारतातील विविध कलांचा जन्म झाला.

विविध कलांतील अवकाशनिर्मितीचे हे सूत्र किती महान होतं हे सांगण्यासाठी समर्थ रामदासांनीही काही अप्रतिम ओळी लिहिल्या आहेत. त्या अशा:

घटी व्यापक जे आकाश | तया नाव घटाकाश | पिंडी व्यापक ब्रम्हांश | त्यास जीवात्मा बोलिजे ||
मठी व्यापक जे आकाश | तया नाव मठाकाश | तैसा ब्रम्हांडी जो ब्रम्हांश | त्यास शिवात्मा बोलिजे ||
मठा बाहेरील आकाश | तया नाव महदाकाश | ब्रम्हांडा बाहेरील ब्रम्हांश | त्यास परमात्मा बोलिजे ||
उपाधी वेगळे आकाश | तया नाव चिदाकाश | तैसा निर्मळात्मा परेश | तो उपाधी वेगळा ||

इथे समर्थ रामदास ऐहिसुखाच्या तीन पातळ्यांसोबत तीन आंतरिक समाधानाच्या पातळ्यांचा उल्लेख करत आहेत. या सर्व सहा पातळ्यांशिवाय व्यापक चैतन्याच्या पातळीचा उल्लेखही ते करतात. तिला निर्गुण-निराकार 'निर्मळात्मा परेश' पातळी मानतात, 'ब्रम्ह' पातळी मानतात! समर्थ रामदासांचे या ओळींतील 'आकाश' विषयक म्हणजेच अवकाशविषयक चिंतन हे भारतीय सर्जनशील अभिजाततेचा दृष्टीकोन अधोरेखित करणारे आहे.

युरोपातही ७ वं ते १४ वं शतक या ७०० वर्षातील 'अंधारयुगा' मुळे आलेल्या 'पुनर्जागृती पर्वात' म्हणजेच 'रेनेसाँमधे' (१४ वं ते १७ वं शतक) असेच अवकाश निर्मिती बाबतचे चिंतन घडले. अंधारयुगात होरपळलेल्या सर्वसामान्य माणसाभोवती ते चिंतन पेरण्याचा यशस्वी प्रयोग झाला. युरोपिअन कलेला अधिक सामान्यजनप्रिय असे रूप दिले गेले. तिच्यातून सामान्य माणसाभोवती 'रचनात्मकता-अभिजातता' पेरण्याचा यशस्वी प्रयोग झाला. वास्तववादी 'सुबोध-सुंदर-भावस्पर्शी' दृश्यकलांना अभिजात स्वरूप प्राप्त झाले. इतकेच नाही तर अशा दृश्यकला नव्या ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञान विकासाचे दालनही खुले करतात हे सिद्ध झालं. या पहिल्या रेनेसाँने मनुष्याला विवेकबुद्धीचे व त्यावरआधारित विज्ञान शक्तीचे महत्व पटवून दिले ज्याच्या बळावर मनुष्याने निसर्गाची अनेक गुपिते उलगडली. 'क्रीएशन ऑफ ऍडम,' मैकलअँजेलो ने रोममधील सिस्टीन चॅपलच्या छतावर काढलेले जगप्रसिद्ध फ्रेस्को चित्र, हे मानवी आत्मबळाचे एक अतिशय बोलके असे स्वरूप आहे. पुढील ३०० वर्षे विज्ञान, तंत्रज्ञान व आर्थिक विचारांनी उत्तरोत्तर प्रगतीकरत प्रथम

औद्द्योगिक क्रांतीच्या आधारे व नंतर माहिती तंत्रज्ञान आणि इंटरनेटच्या आधारे मानवाला २१ व्या शतकात आणून पोहोचवले.

कला ही सृजनबुद्धीचा आविष्कार आहे तर विज्ञान-तंत्रज्ञान हे तर्कबुद्धीचा. त्यांना साथ मिळते रचना-व्यवस्था-यंत्रणेची. सृजनबुद्धी आणि तर्कबुद्धीच्या समन्वयाने आणि रचना-व्यवस्था-यंत्रणेच्या साहाय्याने नवनिर्मितीची प्रक्रिया अविरत घडत असते. त्यात अभिजाततेचा रस मिळाला तर वैय्यक्तिक-सामाजिक-राष्ट्रीय-जागतिक स्तरावर प्रगती होते नाहीतर अधोगती. ह्याची प्रचिती गेल्या २००० वर्षाच्या जागतिक इतिहासात मिळते.

भारतात 'रचना आधारित संस्कृतीची निर्मिती' करणे हे रवी परांजपे फौंडेशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ह्या उद्दिष्टाचा एक भाग म्हणून आम्ही 'अभिजातता - एक परिचय' ह्या परिसंवादाची संकल्पना मांडली आहे. ह्या परिसंवादातून कला व उद्योग क्षेत्रात अभिजाततेचा अर्थ, प्रक्रिया आणि कौशल्य प्राप्तीचे सूत्र शोधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. अभिजातता ह्या विषयावर आधारित संवादःशृंखलेच्या माध्यमातून ‘जनजागृती व कृतियोजना’ हे रवी परांजपे फौंडेशनचे स्वप्न आहे.




१४ जानेवारी म्हणजे 'मकर संक्रांतीचा' दिवस. भारतीय पंचांगात ह्या दिवसाला विशेष महत्व. सूर्याचा मकर राशीत प्रवेश व निसर्गाच्या परिवर्तन प्रक्रियेची सुरुवात, बोचऱ्या थंडीचा अंत, पर्वतराशींवरील बर्फाचे वितळणे, नद्यांचे पुनर्प्रवाह, पृथ्वीच्या गर्भातून नवअंकुर निर्मिती आणि जीवसृष्टीचा नवीन श्वास, नवीन ध्यास. २०१८ सालच्या मकर संक्रांतीचे औचित्य साधून आम्ही 'अभिजातता' हे बीज रोपत आहोत ज्यात कला व उद्योग जगतातील खालील नामवंत आणि प्रतिथयश व्यक्तींनी 'अभिजातता - एक परिचय' ह्या परिसंवादात भाग घेतला:

- श्री. रवी परांजपे, चित्रकार व लेखक
- डॉ. सुचेता भिडे-चापेकर, भरतनाट्यम् नृत्यांगना, संशोधक, संरचनाकार
- पंडित. सत्यशील देशपांडे, हिंदुस्तानी शास्त्रीय गायक, संगीतकार, सांगीतिक विचारवंत व लेखक
- श्री. दीपक घैसास, माहिती तंत्रज्ञान व आरोग्य सेवा क्षेत्रातील उद्योजक

संवादक: श्री. मिलिंद अग्निहोत्री, रवी परांजपे फौंडेशन

तारीख: १४ जानेवारी २०१८; वेळ: सकाळी १०.३० ते १२.३०

स्थळ: एम.ई.एस ऑडीटोरियम, १३१ मयूर कॉलोनी, कोथरूड, पुणे ४११०३८ (बाल शिक्षण मंदिराचे आवार)

परिसंवादाचे चित्रीकरण ह्या संकेत स्थळी उपलब्ध आहे:
https://www.youtube.com/watch?v=w4vhGf8zkc8&t=2s



हा परिसंवाद रवी परांजपे फौंडेशनचा एक शैक्षणिक व सामाजिक प्रबोधनाचा उपक्रम आहे ज्याच्या अनुभवावरून संवादःशृंखलेच्या पुढील पायरीची रचना व नियोजन केले जाईल. ह्या सर्व प्रक्रियेच्या मुळाशी असेल रवी परांजपे फौंडेशन चे उद्दिष्ट आणि स्वप्न - 'भारतात रचना आधारित संस्कृतीची निर्मिती.'

**प्रेषक - श्री. मिलिंद अग्निहोत्री, रवी परांजपे फौंडेशन**